पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

श्रीराम नवमी निमीत्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!

अकोला ■ वर्ष १५ अंक २५६ ■ गुरूवार, दि. २६ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.-MAHMAR/2012/49642
Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026
http://epaper.citynewssuperfast.com



# अकोला नगरी राममय

## प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न !



प्रतिनिधी २६ मार्च

**अकोला:** आज चैत्र शुद्ध नवमी निमित्त अकोला शहरासह संपूर्ण जिल्ह्यात प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मोत्सव अत्यंत भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. 'जय श्रीराम' च्या जयघोषाने संपूर्ण अकोला नगरी दुमदुमून गेली असून ठिकठिकाणच्या राम मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली.अकोल्यातील राम नवमीचे मुख्य आकर्षण असलेल्या पारंपारिक शोभायात्रेची तयारी यंदा विशेष स्वरूपात करण्यात आली होती. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या शोभायात्रेत प्रभू श्रीरामाचा चित्ररथ, पारंपरिक ढोल-ताशा पथके आणि लेझीम पथकांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून या यात्रेचे स्वागत करण्यात आले.पारी बाराच्या सुमारास राम जन्माचा मुख्य सोहळा पार पडला. यावेळी मंदिरांमध्ये पाळणा हलवून पंजिरी आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळपासूनच शहरांतील जुन्या राम मंदिरात आणि राजराजेश्वर मंदिर परिसरात भाविकांनी हजेरी लावली होती. अखंड रामनामाचा जप आणि कीर्तनाच्या कार्यक्रमांनी वातावरण भक्तीमय झाले होते. अनेक ठिकाणी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. शोभायात्रा आणि मंदिरांमधील गर्दी लक्षात घेता अकोला पोलीस प्रशासनाकडून शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतुकीत बदल करून नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात आली. अकोलेकरांचा उत्साह आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा झालेला हा उत्सव सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवणारा ठरला आहे.



### काळाराम मंदिरात प्रभू रामाला 'सोन्याच्या मिशा

नाशिम येथील पंचवटीतील ऐतिहासिक श्री काळाराम मंदिरात रामजन्मोत्सवानिमित्त प्रभू रामचंद्र आणि लक्ष्मण यांना 'सोन्याच्या मिशा' लावून अनुपम शौर्य श्रृंगार करण्यात आला आहे. अरण्यकांडातील १४ हजार राक्षसांच्या वधाचे आणि प्रभूंच्या अजोड पराक्रमाचे प्रतीक म्हणून गुढीपाडवा ते द्वादशीपर्यंत हे विशेष रूप सजवले जाते. पेशवेकालीन या मंदिरात प्रभूंच्या या विलोभनीय दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.



### राज्यभरात राम नवमीचा उत्साह

आज चैत्र शुद्ध नवमी... अधर्मावर धर्माच्या विजयाचे प्रतीक आणि मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव ! मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांच्या जन्मोत्सवाचा सोहळा आज संपूर्ण महाराष्ट्रात अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. चैत्र नवरात्रीची सांगता आणि प्रभू रामांच्या आगमनाचा आनंद व्यक्त करण्यासाठी सकाळपासूनच राज्यातील राम मंदिरांमध्ये भाविकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. 'जय श्रीराम' आणि 'सियावर रामचंद्र की जय'च्या घोषणांनी अवघा आसमंत दुमदुमून गेला असून, गावागावांत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

## भोंदू खरातचे 'गन कनेक्शन' उघड ! २१ काडतुसे जप्त, ५ काडतुसे वापरली

प्रतिनिधी २६ मार्च

**नाशिक:** राज्यभर गाजत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवे आणि धक्कादायक खुलासे होत आहेत. आता खरातकडे असलेल्या बंदुकीचा परवाना खुद्द नाशिक जिल्हा प्रशासनानेच दिल्याचे उघड झाले असून, त्याच्या फार्महाऊसवरून मोठ्या प्रमाणावर काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. यामुळे खरातच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे.

अशोक खरातकडून जप्त बंदुकीचा परवाना नाशिक जिल्हा प्रशासनानेच दिल्याचे उघड झाले आहे. १५ ऑक्टोबर २०१२ रोजी शस्त्र परवाना मंजूर झाला होता. १ जानेवारी २०२४ रोजी परवान्याचे नूतनीकरण झाल्याची नोंद आहे. चौकशीत अशोक खरातच्या फार्महाऊसवरून २१ काडतुसे जप्त करण्यात आली आहे. त्यापैकी ५ काडतुसे वापरलेली, वापर कशासाठी केला याचा तपास सुरू आहे. राज्यभर गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात दररोज नवे खुलासे समोर येत आहे. गेल्या सात दिवसांच्या तपासात शस्त्र बाळगल्याची माहिती समोर आली आहे. काडतुसांचा वापर नेमका कुठे झाला?, तपास यंत्रणांचा शोध सुरू आहे.

## शेगाव नगरीत घुमला जय श्रीरामचा जयघोष ; श्रींच्या चरणी भक्तीचा महाकुंभ !



प्रतिनिधी २६ मार्च

**अकोला:** विदर्भाचे प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पावन अशा शेगाव नगरीत आज भक्तीचा एक वेगळाच कल्लोळ पाहायला मिळाला. चैत्र शुद्ध नवमीच्या पावन मुहूर्तावर, लाखो भाविकांच्या साक्षीने, श्री संत गजानन महाराज संस्थानमध्ये प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

ठीक दुपारी बाराचा ठोका पडला आणि संपूर्ण शेगाव नगरी 'सियावर रामचंद्र की जय'च्या जयघोषाने दुमदुमून गेली. मंदिराच्या गाभाऱ्यात शंखनाद झाला, झांजा-मृदंगाचा मंगल ध्वनी घुमला आणि फुलांनी सजवलेल्या पाळण्यामध्ये प्रभू श्रीरामांचे आगमन झाले. या अलौकिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. सकाळपासूनच शेगावात भक्तांची मांदियाळी जमली होती. श्रींच्या दर्शनासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा आणि मुखात 'गण गण गणात बोते'सह 'जय श्रीराम'चा नामजप, अशा वातावरणाने संपूर्ण संतनगरी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली होती. संस्थानच्या वतीने करण्यात आलेली शिस्तबद्ध व्यवस्था आणि फुलांची नेत्रदीपक सजावट भाविकांचे लक्ष वेधून घेत होती.श्री संत गजानन महाराज संस्थानच्या परंपरेनुसार, श्रीराम जन्मानंतर सुंठवडा प्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिराच्या प्रांगणात झालेली भजने, कीर्तने आणि रामायणातील प्रसंगांच्या वर्णनाने वातावरण अधिकच चैतन्यमय झाले होते. शेगावच्या या उत्सवाने पुन्हा एकदा दाखवून दिले की, भक्ती आणि श्रद्धेचा हा संगम किती अथांग आहे.शेगावच्या या ऐतिहासिक जन्मोत्सवाने प्रत्येक भाविकाच्या मनात चैतन्याचा नवा स्त्रोत निर्माण केला असून, प्रभू रामाच्या आशीर्वादाने अवघी संतनगरी तृप्त झाली आहे.

### शेगावमध्ये ७५० हून अधिक दिंड्या दाखल

शेगावमध्ये आज १३२ वा श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त श्रींच्या मंदिरावर मनमोहक रोषणाई करण्यात आली असून राज्यभरातून ७५० हून अधिक भजनी दिंड्या संतनगरीत दाखल झाल्या आहेत. दुपारी श्रींची पालखी, रथ आणि अश्वासह नगर परिक्रमेसाठी निघणार असून सायंकाळी ६ वाजता मंदिरात परतेल. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता दर्शनासाठी 'एकेरी मार्ग' निश्चित करण्यात आला आहे.

## ऑन-ड्युटी जवानाने स्वत:वरच झाडली गोळी !

प्रतिनिधी २६ मार्च

**अमरावती :** शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या शीघ्र कृती दलामधील (क्यूआरटी) एका जवानाने विजय दिलीप नागापुरे (वय ३५) यांनी काल बुधवारी रोजी सकाळी स्वत: गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय नागापुरे हे मंगळवारी रात्री नाईट ड्युटीवर होते. ड्युटी पूर्ण केल्यानंतर काल बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास त्यांनी पोलीस आयुक्तालयातील क्यूआरटी कार्यालयात स्वतःच्या शासकीय पिस्तुलातून डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती सर्वप्रथम पोलीस कर्मचारी आकाश दिलीप अंबरते यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर संपूर्ण यंत्रणा हलली.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर, अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
› इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
› इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
› शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
› अनुभवी शिक्षकवृंद
› सुसज्ज पायाभूत ईमारत
› दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
› सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
› आनंददायी शिक्षण पध्दती
› CCTV ची सुविधा
› कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
› सुसज्ज प्रयोगशाळा
पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

Samartha Shikshan Prasarak Mandal Reg. No.F.5226 Dwara Sanchalit
Sunshine Kids PRE PRIMARY SCHOOL
PROSPECTUS
A Bright Beginning for Little Learners !
Play & Learn / Creative Activities / Caring Teachers / Fun & Games
Our Programs: +Playgroup + Nursery + Jr.KG + Sr.KG
Why Choose Us ? › Safe & Nurturing Environment › Activity-Based Learning › Personalized Attention › Indoor & Outdoor Play Areas
ADMISSION OPEN
Visit us: Maa Gayatri School, Gayatri Nagar, Kaulkhed Road, Akola
8329639213 Visit time 8:00am to 11:30

J.K. FURNISHING
Sleepwell Gallery
Your Own Mattress Store
• Foam Mattress • Pillow, Cushions
• Coir Mattress • Sofa Fabric
Bhaskar Jawarkar 9146099196 / 9422190280
Aditya Jawarkar 9689509334
Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898

विश्व हिन्दू परिषद व्दारा संचालित
श्री रामनवमी शोभायात्रा समिती, अकोला
भव्य शोभायात्रा
पावन पवित्र श्रीराम नवमी के महापर्व पर ऐतिहासिक पारंपारिक शोभायात्रा का आयोजन इस वर्ष भी उत्साह से किया जा रहा है।
महानगर के आराध्य दैवत भगवान श्री राजराजेश्वर मंदीर में विधीवत पुजा कर शोभायात्रा प्रारंभ होगी।
आप सभी धर्मानुरागी स्नेही स्वजन सहपरिवार सहभागी हो कर अपना धर्मप्रेम प्रगट कर आपकी गरिमामयी उपस्थिती से शोभायात्रा कि शोभा बढायें।
दिनांक-गुरुवार, २६ मार्च २०२६
समय -शाम ५ बजे
स्थान - श्री राजराजेश्वर मंदीर, अकोला
श्री रामनवमी शोभायात्रा समिती, अकोला
श्री कृष्णा गोवर्धनजी शर्मा, स्थायी अध्यक्ष | श्री अरुण बालमुकुंदजी शर्मा, अध्यक्ष | श्री राजू रामदासजी मंजुळकर, विहिप अध्यक्ष

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अमृत संस्थेमार्फत टंकलेखन व लघुलेखन परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स (GCC-TBC) आणि लघुलेखन परीक्षेचा निकाल १० मार्च २०२६ रोजी जाहीर झाला आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी 'अमृत' संस्थेने परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना सुरू केली असून, पात्र विद्यार्थ्यांनी ३० एप्रिल २०२६ पर्यंत आपले अर्ज ऑनलाईन सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे. या योजनेचा लाभ प्रामुख्याने अमृतच्या लक्षित गटातील (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, कानबी) यांसारख्या विविध समाजातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, जिल्ह्यातील २४ वा सौर प्रकल्प सुरू

## दिया सौर प्रकल्पामुळे जिल्ह्याने ओलांडला १०० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचा टप्पा

प्रतिनिधी २६ मार्च



**अमरावती:** धारणी तालुक्यातील दिया येथील १० मेगावॅटचा सौर प्रकल्प कार्यान्वित झाल्याने, राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०', योजनेत जिल्ह्याने १०० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचा टप्पा पूर्ण केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ३७ हजार ३५५ शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळायला सुरूवात झाली आहे.

शेतकऱ्यांची दिवसा विजेची मागणी पुर्ण करण्यासाठी ठमुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०ठ या महत्वाकांक्षी योजनेत विकेंद्रीत स्वरूपाचे सौर प्रकल्प उभारून राज्यात १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे. अमरावती परिमंडळ मध्ये मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती मिळाली आहे.अमरावती जिल्ह्यात या योजनेअंतर्गत ३२८ मेगावॅट वीज निर्मितीचे लक्ष असून २४ सौर प्रकल्प पूर्ण होऊन सुरू झाल्यामुळे जिल्ह्याची सौर ऊर्जा निर्मितीची क्षमता ११० मेगावॅट झाली आहे.

मेळघाटासारख्या दुर्गम क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी या योजनेचे महत्व अधिक असून धारणी तालुक्यात २६ मेगावॅट क्षमता असलेले ३ प्रकल्प सुरू झाले आहे. यामध्ये आज कार्यान्वित झालेला १० मेगावॅट क्षमता असलेला दिया येथे कढाव उपकेंद्रासाठी आणि डाबका उपकेंद्रासाठी ५ मेगावॅट तसेच कळमखार धारणी उपकेंद्रकरिता ११ मेगावॅट क्षमता असलेले असे दोन प्रकल्प याअगोदरच सुरू झाले आहे. त्यामुळे धारणी तालुक्यातील ८ वाहिन्यांवर असलेल्या ३१०९ शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. दिया सौर प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या ३३ केव्ही कढाव उपकेंद्राला जोडण्यात आली आहे आणि या उपकेंद्राच्या माध्यमातून हरिसाल, दुणी आणि पाटिया या ११ केव्ही वाहिनीच्या माध्यमातून या वाहिनीवरील ११७४ शेतकऱ्यांना दिवसा आणि खात्रीशिर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे.

# चांदूर बाजारात शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचे उत्साहात स्वागत

## आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांची बियाणे व लाडू तुला

प्रतिनिधी २६ मार्च



**चांदूर बाजार :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचे चांदूर बाजार तालुक्यात जल्लोषात स्वागत करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून कर्जमाफीसाठी सुरू असलेल्या संघर्षाला यश मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कर्जमाफी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेल्या शेतकऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी आंदोलकांची बियाणे आणि लाडू तुला करून त्यांचा गौरव करण्यात आला. बियाण्यांच्या तुलनेतून शेतीचे आणि शेतकऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, तर लाडू तुला करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात अशोक नारायण तायडे यांची लाडूतुला करण्यात आली, तर दिलीपराव भाकरे यांची बिजतुला करून त्यांचा सत्कार करण्यात आला. तुला करण्यात आलेले बियाणे विधवा महिलांना वाटप करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच जनार्दन राऊत यांना पूर्ण कपडे देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी झालेल्या आंदोलनांच्या आठवणींना उजाळा दिला. उपोषण, मोर्चे आणि विविध आंदोलनांच्या माध्यमातून शासनापर्यंत आपला आवाज पोहोचवण्यासाठी केलेला संघर्ष आठवत अनेक शेतकरी भावूक झाले. 'हा निर्णय आमच्या संघर्षाचा विजय आहे,' अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. यावेळी बच्चू कडू म्हणाले की, 'हा लढा इथेच संपलेला नाही. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळाला पाहिजे ही आमच्या लढ्यातील प्रमुख मागणी आहे. तसेच आज २ लाखांपर्यंतची कर्जमाफी झाली असली तरी जे शेतकरी नियमितपणे कर्जाची परतफेड करतात, त्यांनाही २ लाखांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ मिळाला पाहिजे. यासाठी आम्ही पुढेही प्रयत्नरत राहणार आहोत.

# पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात 'फार्माकोविजिलन्स' वर जनजागृती कार्यक्रम

प्रतिनिधी २६ मार्च




**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेदमध्ये 'फार्माकोविजिलन्स' मूलभूत संकल्पना आणि ए.डी.आर. रिपोर्टिंग' या विषयावर एक दिवसीय जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर येथील डॉ. मनीष भोयर (सहयोगी प्राध्यापक व समन्वयक, PPVC 028) उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात डॉ. भोयर यांनी आयुर्वेदिक औषधांच्या सुरक्षिततेवर प्रकाश टाकला. औषधांमुळे होणारे दुष्परिणाम (ADR) कसे ओळखावे आणि त्यांची अधिकृत नोंद कशी करावी, याचे प्रात्यक्षिक त्यांनी डॉक्टर, शिक्षक, नर्सिंग स्टाफ व विद्यार्थ्यांना दिले. 'आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी औषधांच्या सुरक्षिततेचे दस्तऐवजीकरण करणे ही काळाची गरज आहे,' असे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी औषधनिर्माण आणि रुग्णांच्या सुरक्षिततेबाबत विविध शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्ष बी.ए.एम. एस. च्या विद्यार्थिनी कु.साक्षी अवचार आणि कु.श्रुती राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन फार्माकोविजिलन्स सेल च्या समन्वयक डॉ.प्राची शहाणे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील डॉक्टर, शिक्षक, नर्सिंग स्टाफ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विभागीय दक्षता व नियंत्रण समिती त्रैमासिक आढावा बैठक

## समितीपुढे सादर प्रकरणे तातडीने निकाली काढावीत-विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

प्रतिनिधी २६ मार्च



**अमरावती :** विभागीय दक्षता व नियंत्रण समितीपुढे सादर सर्व प्रकरणांचा तपास गतीने पूर्ण करावा. दाखल झालेल्या प्रकरणासंबंधी गुन्ह्याची नोंद, तपास, चौकशी योग्यरितीने करुन प्रकरणांचा निपटारा तात्काळ होण्याचे दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित शासकीय यंत्रणांना आज दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विभागीय दक्षता व नियंत्रण समितीची त्रैमासिक आढावा बैठक श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्यासह पाचही जिल्ह्यांचे पोलीस अधिक्षकांचे प्रतिनिधी व समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त आदी यावेळी उपस्थित होते.

अनुसूचित जाती, जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ दाखल प्रकरणे व मंजूर प्रकरणांच्या संदर्भात पिडीतांना अर्थसहाय्य सद्यस्थितीबाबत तसेच न्यायालयात दाखल व प्रलंबित प्रकरणांबाबत श्रीमती केदार यांनी माहिती सादर केली.

अमरावती विभागामध्ये माहे एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ अखेर पर्यंत एकूण ८१ प्रकरणे पोलीस स्तरावर प्रलंबित आहेत. यामध्ये अमरावती (शहरी)-४ प्रकरणे, अमरावती (ग्रामिण)-६ प्रकरणे, अकोला जिल्ह्याची-८, यवतमाळ-१३ प्रकरणे, बुलडाणा ३३ प्रकरणे तर वाशिम जिल्ह्यांची १७ प्रकरणे असे एकूण ८१ प्रकरणे पोलीस तपासावर सद्यस्थितीत प्रलंबित आहेत. यापैकी ३३ प्रकरणांचा पोलीस तपास पूर्ण झाला आहे. तर २ प्रकरणे पोलीस तपासाअंती निकाली निघालेली आहेत. यानुषंगाने पोलीस तपासावरील प्रलंबित ४६ प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

सन १९९५ ते मार्च २०२६ अखेर न्यायालयात एकूण ७९९२ प्रकरणे दाखल झाली आहेत. त्यापैकी ४४२५ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यातील एकूण ४४८ प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा झाली आहे. ३९९७ प्रकरणांमध्ये आरोपी निर्दोष सुटले आहे. सद्यस्थितीत ३५४७ प्रकरणे न्यायालयाच्या स्तरावर प्रलंबित आहेत. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची संख्या जास्त प्रमाणात आहे. सदर प्रकरणे निकाली निघण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीने दरमहा नियमितपणे आढावा घ्यावा. तसेच संबंधित जिल्हा शासकीय अभियोक्ता यांनी प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघतील, यादृष्टीने पाठपुरावा करावा, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

# ऑनलाईन अर्ज भरण्यास २७ मार्चपासून सुरुवात

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २१ जून रोजी

प्रतिनिधी २६ मार्च

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २१ जून रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तसेच परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज व परीक्षा शुल्क २७ मार्च ते १६ एप्रिल या कालावधीत भरता येणार आहे, अशी माहिती परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चौथे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली.

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व मंडळाच्या, सर्व माध्यमांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमेदवारांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी पेपर १, इयत्ता सहावी ते आठवीसाठी पेपर २ या पध्दतीने परीक्षा घेतली जाते. त्यानुसार दि. २१ जून रोजी सकाळी साडेदहा ते एक यावेळेत पेपर १ तर दुपारी २.३० ते पाच या वेळेत पेपर २ ची परीक्षा घेतली जाणार आहे.

ऑनलाईन अर्ज भरणे, परीक्षा शुल्क व अन्य माहिती परीक्षा परिषदेच्या htttps://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रवेशपत्राची ऑनलाईन प्रिंट ९ जून ते २१ जून दरम्यान उपलब्ध करुन दिल्या जाईल. प्रशासकीय अडचणींमुळे वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षार्थ्यांसाठी अद्ययावत माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल, याची परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे परीक्षा परिषदेव्दारे कळविण्यात आले आहे.

# पोलीस महासंचालकांच्या मार्गदर्शक सुचना नुसार गुन्हे शाखेत काम करण्यास पीआय चव्हाण अपात्र-आ. संजय खोडके

## अमरावतीची कायदा व सुवस्था सुधारण्यासाठी गुन्हे शाखेच्या कामकाजात बदल करण्याची गरज - आ.संजय खोडके

प्रतिनिधी २६ मार्च



**अमरावती :** राज्यात पोलीस विभागाची कामगिरी सुधारत असून गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी गृहविभागाचे चांगल्या पद्धतीने काम सुरु आहे. त्यादृष्टीने अमरावती शहर पोलीस विभाग हा आयुक्तालय दर्जाचे असूनही येथील वरिष्ठ पोलीस अधिकारी हे एम.डी ड्रग्स विरोधी व अंमली पदार्थ विक्री संदर्भात कारवाई करण्याबाबत हतबल दिसून येत आहे. एकट्या गुन्हे शाखेला कारवाई करण्याचे अधिकार दिले असल्याने याबाबत सारशंका उपस्थित होत आहे. गुन्हे शाखेने पीआय संदीप चव्हाण हे गुन्हे शाखेत पीआय म्हणून काम करण्यासाठी पोलीस महासंचालकांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोणत्याही पात्रतेत बसत नसून ते तात्पुरते पीआय असल्याने त्यांच्या कामकाजावर सारशंका उपस्थित करून आ.संजय खोडके यांनी अमरावतीच्या गुन्हे शाखेचे पीआय चव्हाण यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी विधान परिषदेतून केली आहे.

आज बुधवार दिनांक २५ मार्च रोजी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधान परिषदेमध्ये अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावतीच्या कायदा व सुवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सभागृहात महत्वाचे मुद्दे उपस्थित करतांना अमरावती शहरात अंमली पदार्थ विक्रीचे प्रमाण वाढत असल्याने अमरावती शहर हे एम.डी. तस्करीचे हब बनत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. या संदर्भात मागील आठवड्यात अधिवेशनात मुद्दा उपस्थित केल्या नंतर दोन दिवसांनी गुन्हे शाखेच्या वतीने धाडी टाकून कारवाई करण्यात आली. तो पर्यंत कोणतीही कारवाई झाली नसून आता सर्व कार्यवाया गुन्हे शाखेच्या वतीने करण्यात आल्या. ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एम. डी.ड्रग्स सारखे अंमली पदार्थ आढळून आले आहेत . तिथे गुन्हे शाखेच्या वतीने धाडी टाकून कारवाही केली. मात्र संबधित पोलीस स्टेशन चे अधिकारी व आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी याबाबत कारवाईला घेऊन हतबल असल्याबाबत आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले. त्यांनी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या कामकाजावर देखील सारशंका व्यक्त करून ते तात्पुरते पोलीस निरीक्षक असल्याचे सांगितले.

# बिबट्यांच्या संचारामुळे वडाळी, मंगलधाम, एसआरपीएफ भागातील नागरिकांमध्ये दहशत- आ.सौ. सुलभाताई खोडके

## बिबट्या पासून अमरावती शहरवासीयांचे संरक्षण करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा

प्रतिनिधी २६ मार्च




**अमरावती :** अमरावती शहरी भागात बिबट्याने संचार केल्याच्या घटना वारंवार समोर येत आहे. शहरालगत असलेल्या वडाळी वनपरिक्षेत्रातही बिबट्या शहरात भटकंती करत असल्याने वडाळी, विद्यापीठ, तपोवन परिसर , मंगलधाम परिसर , एसआरपीएफ कॅम्प , जुना बायपास भागातील नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. बिबट्या पासून मानवी जीवितास धोका पोहोचू नये म्हणून शासनाची काय उपाययोजना आहे व यासंदर्भात वनविभागाला निर्देशित करण्यात आले आहे का ? असा प्रश्न अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळातून उपस्थित केला.

यावेळी आमदार सुलभा खोडके यांनी सभागृहासमक्ष सांगितले कि, अमरावती शहराच्या लगतच वडाळी वनपरिक्षेत्र व पोहरा जंगल असून या भागात बिबट्याच्या मोठा अधिवास आहे. या वनपरिक्षेत्रात बिबट सह इतरही वन्यजीव हे अन्न -पाणीच्या शोधात शहराकडे भटकंती करत असून त्यांनी रहिवाशी भागातील पाळीव जनावरे फस्त केल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. शहरालगतच्या वडाळी, विद्यापीठ, तपोवन परिसर , मंगलधाम परिसर , एसआरपीएफ कॅम्प , जुना बायपास भागात बिबट्याने शिरकाव केल्याचे सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. मंगलधाम परिसरात तर बिबट्याच्या दहशतीमुळे कुणीही सायंकाळी ६ नंतर घराबाहेर पडत नसून ऑटो -रिक्षा देखील मिळत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अमरावती शहरालगतच्या परिक्षेत्रातील बिबट्यांना वेळीच मज्जाव न घातल्यास ते शहराच्या मध्यवस्तीपर्यंत पोहोचतील, असे अनेकदा समोर आले आहे. दोन वर्षांपूर्वी बिबट्याने चक्क व्हीएमव्ही परिसर व पुंडलिकबाबा नगर , पाठपुस्तक मंडळ पर्यंत शिरकाव करून धुमाकूळ घातला होता. याबाबतसुद्धा आमदार सुलभा खोडके यांनी सभागृहाला अवगत करून वनमंत्री ना. गणेश नाईक यांचे लक्ष वेधले.

बिबट्या शहरालगतच्या जंगल भागातून भटकंती करत अन्नाच्या शोधात शहरात येत असल्याने त्याच्या मूळ वास्तव्याच्या ठिकाणी म्हणजेच शहरालगतच्या जंगल भागाला चैनलिंग फेन्सिंग करणे आवश्यक आहे. अशी सुचना सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहासमक्ष केली. याकडे सुद्धा गंभीरतेने लक्ष देण्याची गरज असल्याचे आमदार महोदयांनी सभागृहात सांगितले. पोहरा -वडाळी वनपरिक्षेत्रातील बिबट्या व अन्य वन्यजीव शहराकडे येणार नाही व वन्यजीवांपासून मानवी जीवितास धोका पोहोचवू नये , यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात आल्या ? तसेच वनविभागाला तसे दिशा निर्देश देण्यात आले का ? असा प्रश्न आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी विधानसभेतून उपस्थित केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट

# खामगाव



ऐतिहासिक वारशाने समृद्ध असलेल्या बुलढाणा येथील पेठेतील श्री राम मंदिरात सपत्नीक दर्शन घेतले. मंदिराच्या प्राचीन व भारतीय सांस्कृतिक वातावरणात प्रभू रामांच्या चरणी नतमस्तक होऊन आरती केली.

## दारूची अवैध वाहतूक; पोलिसांनी एकास पकडले!

प्रतिनिधी २४ मार्च

**खामगाव :** शहर पोलिसांनी दारूच्या अवैध वाहतुकी विरोधात कारवाई करत एकाला अटक केली. खामगाव-शेगाव रोडवरील शर्मा टर्निंग परिसरात दुपारी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत आरोपीकडून ३ हजार ८५० रुपयांचा दारू साठा जप्त करण्यात आला. मिळालेल्या माहितीच्या आधारे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस अंमलदार गणेश कोल्हे यांच्या पथकाने सापळा रचला होता.संशयित हालचालींवर नजर ठेवताना नारायण शंकर अवचार (३३, रा. पारखेड) हा व्यक्ती दारूची बेकायदेशीर वाहतूक करताना आढळून आला.पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान आरोपीकडून देशी-विदेशी दारूच्या ३० मिलीच्या एकूण ९६ बाटल्या जप्त करण्यात आल्या. हा साठा विक्रीसाठी नेला जात असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. जप्त केलेल्या दारूची किंमत सुमारे ३हजार ८५० रुपये असल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी आरोपी नारायण अवचार याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (इ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## जवळा बु. येथे दोन गटांत हाणामारी; १३ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी २४ मार्च

**खामगाव :** शेगाव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथे किरकोळ कारणावरून दोन गटांत हाणामारीत झाल्याची घटना २४ मार्च रोजी घडली. याप्रकरणी २५ मार्च रोजी परस्परविरोधी तक्रारीवरून शेगाव ग्रामीण पोलिसांनी एकूण १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखले केला. मिळालेल्या माहितीनुसार, मोहम्मदखाँ रुस्तमखाँ (६२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा २ वर्षाचा नातू घरासमोर खेळत असताना गणेश वाडोकार याच्या मोटार सायकलचा त्याला धक्का लागला. यावरून झालेल्या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. आरोपी मयूर श्रीकृष्ण लोखंडे, ऋषिकेश विलास काळे,सुशांत नितीन सोनटक्के, सुजित अनंता मसने, विश्वजीत किसन मसने व नयण किसन मसने यांनी बेकायदेशीर मंडळी जमवून मारहाण केली. तसेच सुज्जल अनंता मसने (२३) यांनीही तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, जवळा बु, येथे गर्दी पाहून ते गेले असता, मोहम्मदखाँ यांच्या नातवाला धक्का लागल्याच्या कारणावरून वाद सुरू होता. समजूत घालण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी मोहम्मदखाँ अशपाकखाँ, रुस्तमखाँ, शब्बीरखाँ, सलीम शमशेर खान, अतीक नूर शहा, एजाज याकूब खान व अकील मोहम्मदखाँ यांनी फिर्यादी व त्यांचा मित्राला अडवून अश्लील शिवीगाळ केली.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. २६ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## कार्ड नोंदणी अभियान उत्साहात संपन्न

**अकोला :** जुन्या शहरातील अग्रवाल कॉम्प्लिंट आणि सनातन संस्कृती महासंघ या सामाजिक संघटनेच्या वतीने जेष्ठ नागरिक कार्ड, आयुष्यमान भारत, ई- रेशन, आधार लिंक पॅन कार्ड, मतदार कार्ड अद्यावत करणे आदी कार्डचे नोंदणी अभियान २३ ते २५ मार्च या कालावधीत राबविण्यात आले. जेष्ठ कार्यकर्ते मनोज अग्रवाल, विनोद देव, जयंत इंगळे, विजय केंदरकर, मिलिंद गायकवाड यांनी श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करून नोंदणी कार्यक्रमाला सुरुवात केली. अनेक नागरिकांनी या नोंदणी अभियानाचा लाभ घेतला. या उपक्रमात केलेल्या योग्य मार्गदर्शना बद्दल त्यांनी आयोजकांचे आभार व्यक्त केले. अभियानासाठी अग्रवाल कॉम्प्लिंटचे संचालक, सनातन संस्कृती महासंघाचे हेमंत जकाते, नरेंद्र कराळे, अमित शिरसाट, अमोल देशपांडे, सुबोध देशमुख, अमित अग्रवाल, हेमल खिलोसिया, , मोहित नायसे, महेश शाह, पंकज सिधारा, ऋषीकेश जकाते आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. मिलिंद आनंद घोगले यांना पीएच.डी. प्रदान



**अकोला:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने डॉ. मिलिंद आनंद घोगले यांना इंग्रजी विषयात पीएच डी प्रदान केली. घोगले यांनी संशोधन कार्य डॉ. ए. एल. कुलट प्राचार्य, श्री शिवाजी आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्यांच्या प्रबंधाचा विषय 'थीम ऑफ रिलिजन अँड डिग्रेडेशन ऑफ मॉरल व्हॅल्यूज इन द सिलेक्ट नॉवेल्स ऑफ जॉन अपडाइक असा असून, या संशोधनामध्ये जॉन अपडाइक यांच्या निवडक कादंबऱ्यांतील धार्मिक संकल्पना आणि नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचा सखोल व चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. सध्या डॉ. मिलिंद घोगले हे न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात सहायक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

## कोषागारे ३१ मार्चला सुरू राहतील

**अकोला:** आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने सार्वजनिक सुट्टी असली तरीही भारतीय स्टेट बँक, कोषागार कार्यालय व उपकोषागार कार्यालये मंगळवारी (३१ मार्च) सुरू ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत. आर्थिक वर्षातील ३१ मार्च हा शेवटचा दिवस आहे. त्यादिवशी महावीरजयंतीची सार्वजनिक सुट्टी आहे. मार्चअखेरीस शासनाचा निधी अखर्चित राहू नये व शासनाच्या जमा-खर्चाचे आर्थिक व्यवहार सुरळीत व त्याचरोजी पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय स्टेट बँक, कोषागार कार्यालय, उपकोषागार कार्यालये रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी श्रीमती मीना दिले आहेत.

## संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यास मंजुरी

**अकोला:** ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. एप्रिल ते जून दरम्यान अडीचशे गावांसाठी २९९ उपाययोजनांचा समावेश असून, कामे वेळेत पूर्ण व्हावीत. कुठेही टंचाई उद्भवणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत.

# श्रीराम चौकात महाआरती आणि महाप्रसाद वितरणाला भक्तांचा उदंड प्रतिसाद

### ◆ दुपारी १२ वाजता महिला पुरुषांच्या प्रचंड उपस्थितीत महाआरती





प्रतिनिधी २६ मार्च

**अकोला:** श्रीराम नवमीच्या निमित्ताने बिरला गेट नंबर २ परिसरात 'जय श्रीराम मित्र मंडळा'च्या गुरुवारी दुपारी झालेल्या महाआरती मध्ये महिला पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्री रामाचा जयजयकार करण्यात आला. हजारो भक्तांसाठी दुपारी १२:३० पासून महाप्रसादाचे वाटप तसेच ११ हजार तुळशी रोपांचे वितरण सुरू केले.

प्रभू श्रीरामांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने 'जय श्रीराम मित्र मंडळा'ने बिरला गेट नंबर २ श्री राम चौकात भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रामनवमीला दुपारी १२ वाजता महाआरती झाली. मंडळाने केलेल्या आवाहनाला हजारो भाविकांनी प्रतिसाद दिला. महाआरतीत सहभागी झाले होते. महाआरती

रामनवमीचे मुख्य आकर्षण ठरली. दुपारी साडेबारा वाजेपासून ते रात्री साडेबारा वाजेपर्यंत महाप्रसाद वाटप सुरू झाले. तसेच, पर्यावरण आणि भक्तीचा संगम साधत ११,००० तुळशीच्या रोपांचे मोफत वाटप करण्यात येत आहे.

चौकात देवी-देवता आणि महापुरुषांच्या प्रतिमांनी अतिशय सुंदर वातावरण निर्मिती केली आहे.

येथे हजारो भक्त दर्शनासाठी येथे येत असून भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. येथील सजावट आणि रोषणाई सध्या शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. या पवित्र प्रसंगी जय श्रीराम मित्र मंडळाने सर्वांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसाद ग्रहण करण्याचे आणि हिंदू एकतेचे दर्शन घडवण्याचे आवाहन केले होते. त्याची परिणती उपस्थितीने आली.

## हिवरखेड मध्ये श्री रामनवमी निमित्ताने राम भक्तांची विराट रॅली



प्रतिनिधी २६ मार्च

**हिवरखेड:** येथे श्री रामजन्मोउत्सव समितीच्या वतीने श्रीराम नवमीला गावातून विराट रॅली काढण्यात आली. तसेच राम मंदिरात जन्म उत्सव नाईक कुटुंबाच्या वतीने दुपारी १२ वाजता साजरा करण्यात आला, असून संध्याकाळी भव्य श्रीरामसीता शोभायात्रा काढण्यात आली. रॅली मध्ये युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. जय श्री रामच्या घोषणा देण्यात आल्या. गावात सकाळपासून उत्साह संचारला होता.

## धामोरी येथे जलदिंडी व महिला मेळावा उत्साहात

प्रतिनिधी २६ मार्च



**मुर्तिजापूर:** मृद व जलसंधारण कामे लोकसहभागातून प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या वतीने दि. २३/०३/२०२६ ला ग्राम धामोरी ब्रु.(ता. मूर्तिजापूर, जि. अकोला) येथे 'जलदिंडी व महिला मेळावा' चे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रम चे आयोजन जिल्हा कृषी अधीक्षक श्री. मुरली इंगळे सर, उपविभागीय कृषी अधिकारी अकोला श्री. विवेक बिऱ्हाडे सर, नोडल अधिकारी श्रीमती अनुप्रीता जाधव मॅडम, तालुका कृषी अधिकारी श्री. दिपक तायडे सर यांच्या आदेशानुसार करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन साय्यक कृषी अधिकारी श्री. श्रीकांत देशमुख, NRM Coordinator श्री. अभिनंदन पारसकर व समूह सहाय्यक संदेश डांबलकर व राहुल वाडेवाल यांनी केले.

या जलदिंडीला गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. पाणी, माती आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी गावातून जलदिंडी काढण्यात आली.

ही केवळ एक मिरवणूक नसून पाणी संवर्धनाची लोकचळवळ उभी करण्याचा एक प्रेरणादायी प्रयोग ठरला आहे. गावकऱ्यांच्या सहभागातून मृद व जलसंधारण कामे अधिक प्रभावीपणे राबविता येतात, याची जाणीव या उपक्रमातून झाली.

त्याच प्रमाणे महिला मेळाव्या च्या माध्यमातून ‌पाणी वाचवा – शेती वाचवा – भविष्य सुरक्षित करा‌ हा संदेश देत ग्राम धामोरी ब्रु. महिलांनी जलसंवर्धनासाठी एकजुटीने पुढे येण्याचा संकल्प केला. अशा लोकसहभागातूनच शाश्वत शेती आणि जलसंपन्न गावांचा मार्ग तयार होतो. या मेळाव्या च्या माध्यमातून महिलांनी रांगोळ्या, फुगड्या, गायनातुन प्रकल्पा चा प्रचार प्रसार केला व आनंदी मय वातावरणात कार्यक्रम संप्पन करण्यात आला. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत विविध योजनेचा लाभ घेण्याकरिता ग्रामस्थांनी प्रयत्न करावे असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, अकोला यांच्यामार्फत करण्यात आले.

## वाढदिवसाचा आनंद अनाथ मुलांच्या सहवासात

### पंकज देशमुख यांनी 'सूर्योदय' आश्रमात पसरविले हास्य !

प्रतिनिधी २६ मार्च



**अकोला :** माणूस आपला वाढदिवस अनेकदा मोठ्या हॉटेल्समध्ये किंवा झगमगाटात साजरा करतो, पण समाजाप्रती असलेली आपली बांधीलकी जपत, आर आर सी नेटवर्कचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी आपला वाढदिवस एका वेगळ्या आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरा केला. मलकापूर येथील 'सूर्योदय बालक आश्रम' मधील चिमुकल्यांच्या सहवासात केक कापून आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवून पंकज देशमुख यांनी वाढदिवसाचा खरा आनंद मिळवला.

वाढदिवसाचे औचित्य साधून पंकज देशमुख यांनी आश्रमातील अनाथ आणि निराधार मुलांसोबत वेळ घालवला. जेव्हा सरांनी मुलांच्या उपस्थितीत केक कापला, तेव्हा त्या मुलांच्या डोळ्यांतील चमक आणि टाळ्यांचा कडकडाट संपूर्ण आश्रमात गुंजला. केवळ औपचारिक कार्यक्रम न ठेवता, सरांनी या लहान मुलांशी संवाद साधला, ज्यामुळे मुलांनाही आपलेपणाची ऊब मिळाली. केवळ केक कापून हा सोहळा थांबला नाही, तर या खास दिवशी आश्रमातील सर्व मुलांना 'पावभाजी' आणि मिष्ठान्नची मेजवानी देण्यात आली. मुलांच्या ताटात गरम वाफाळलेली पावभाजी वाढताना पंकज देशमुख यांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळत होते. या स्नेहपूर्ण कार्यक्रमात पंकज देशमुख यांच्या सोबत चिन्मय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. हा संपूर्ण उपक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांच्या मित्रपरिवाराने मोठी मेहनत घेतली. यामध्ये मोहन देशमुख, दिलीप पुंड, चेतन वानखडे, प्रतीक पांडव, सुयोग देशमुख, प्रशांत जाधव, शरद पवार, गजानन ठाकरे, दिगांबर सालकर आणि हरिदास मोंडोकर यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## मोर्शी नगरपरिषदेवर सतीश डफळे यांची स्वीकृत सदस्यपदी निवड

प्रतिनिधी २६ मार्च



**अकोला :** मोर्शी येथील राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातील सक्रिय व्यक्तिमत्व सतीश डफळे यांची मोर्शी नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण असून, सतीशभाऊंच्या कार्याची दखल घेत त्यांची ऑल इंडिया कबड्डी फेडरेशनच्या मीडिया समितीवर देखील नियुक्ती करण्यात आली आहे. या दुहेरी यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सतीश डफळे यांच्या निवडीचे औचित्य साधून यंग क्लब, अकोलाचे सचिव तथा अकोला महानगर कबड्डी असोसिएशनचे सचिव राजू नेरकर यांनी मोर्शी येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला. यावेळी त्यांच्यासोबत अकोला महानगर कबड्डी असोसिएशनचे संघटक प्रल्हाद ढोरे यांचीही उपस्थिती होती. अकोला क्रीडा क्षेत्राच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सतीशभाऊंचा गौरव करण्यात आला. सतीश डफळे यांचे कबड्डी क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे. राष्ट्रीय स्तरावरील मीडिया समितीवर झालेली त्यांची निवड ही विदर्भातील कबड्डी प्रेमींसाठी अभिमानाची बाब असल्याचे मत राजू नेरकर यांनी यावेळी व्यक्त केले. या निवडीबद्दल यंग क्लब अकोलाचे अध्यक्ष नरेश रणधीर यांनी सतीश डफळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी मोर्शी येथील स्थानिक कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आखाती युद्धामुळे स्नान करणे सुद्धा होईल महाग

### ◆ साबण व डिटर्जंट इंडस्ट्रीला सतावतोय सल्फर चा तुटवडा

प्रतिनिधी २६ मार्च

**अकोला :** मागील पंधरा दिवसापासून सुरू असलेल्या आखाती युद्धामुळे देशात पेट्रोल डिझेल व गॅस ची टंचाई, खाद्य तेलाचे भडकलेले भाव, आदीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. या युद्धाचे परिणाम वेगवेगळ्या उद्योग क्षेत्रांवर पाहायला मिळत आहे याचा फटका केमिकल इंडस्ट्रीला देखील बसला आहे पुरवठा साखळी प्रभावित झाल्याने सुमारे ३०० हून अधिक रसायनाच्या किमतीत २०० टक्क्यांनी वाढ झाली आहे समुद्रमार्गात सल्फर अडकल्याने सल्फुरिक ॲसिडचे दर जवळपास तिप्पट झाले आहेत त्यामुळे त्यावर आधारित केमिकल उद्योगाला याचा जबर फटका बसत आहे. सल्फर चा वापर करून सल्फ्युरिक ॲसिड तयार केले जाते हे बेसिक केमिकल आहे. याचा पूर्ण कच्चामाल आखाती देशातून आयात केला जातो परंतु समुद्री मार्ग बंद असल्यामुळे व मुख्य इंधन तेल व गॅसचा तुटवडा असल्यामुळे बेसिक केमिकलचे दर २०० टक्क्यांपर्यंत वाढले आहेत सल्फ्युरिक ॲसिड पासून शेकडो प्रकारचे केमिकल तयार केले जातात परंतु याची आयात थांबल्याने सर्वच उद्योगांवरील खर्चाचा भार वाढण्याची व परिणामी त्यापासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंची भाववाढ होण्याची शक्यता आहे. विविध प्रकारचे साबण, सिंथेटिक डिटर्जंट, शाम्पू, क्लिनिंग एजंट तयार करण्यासाठी सल्फ्युरिक ॲसिड चा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो सद्यस्थितीत सल्फ्युरिक ॲसिडच्या किमती वाढल्यामुळे लवकरच डिटर्जंट तसेच साधनाच्या किमती वाढण्याची शक्यता या व्यवसायातील तज्ज्ञांनी वर्तवली आहे. त्यामुळे हे युद्ध असेच सुरू राहिल्यास सुगंधित साबनाने आंघोळ करणे, तसेच डिटर्जंट व कपडे धुण्याच्या साबनाने कपडे धुणे महाग होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




## एम. स्क्वेअर सीबीएसई 10 वी मध्ये सलग 2 वर्ष टॉपर्स देणारी संस्था

प्रतिनिधी २६ मार्च






**अकोला :** शहरात अनेक कोचिंग क्लासेस असतानाही, गुणवत्ता आणि निकालाच्या जोरावर 'एम स्क्वेअर ट्युटोरियल'ने विद्यार्थी आणि पालकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. गेल्या दोन वर्षांपासून सीबीएसई बोर्डाच्या १० वीच्या परीक्षेत या संस्थेचे विद्यार्थी सातत्याने 'टॉपर' येत असून, नुकत्याच जाहीर झालेल्या सीए फाउंडेशनच्या पहिल्याच बॅचला अभूतपूर्व यश मिळाले आहे.

अकोला शहरात स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करून घेणाऱ्या संस्थांमध्ये 'एम स्क्वेअर ट्युटोरियल'ने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. गेल्या दोन वर्षांपासून सीबीएसई १० वीच्या बोर्ड परीक्षेत येथील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळवत अव्वल स्थान पटकावले आहे. पालकांचा वाढता ओढा पाहता ५ मार्चपासून सुरू झालेल्या दोन बॅचेस हातोहात 'फुल' झाल्या असून, विद्यार्थ्यांच्या मागणीखातर तिसरी बॅच लवकरच सुरू केली जाणार आहे. तसेच, १ एप्रिलपासून इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होत असून, पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. एम स्क्वेअर ट्युटोरियलच्या 'सीए फाउंडेशन'च्या पहिल्याच बॅचला ऐतिहासिक यश मिळाले आहे. परीक्षेला बसलेल्या १२ पैकी ७ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे. १६ मार्चपासून 'सीए इंटर फाउंडेशन' बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इयत्ता ११ वी आणि १२ वी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच 'सीईटी' परीक्षेसाठी प्रवेश प्रक्रिया सध्या जोरात सुरू आहे. येथे विद्यार्थ्यांना केवळ शिकवले जात नाही, तर परीक्षेच्या तणावाचे नियोजन करण्यासाठी विशेष 'काउन्सेलिंग' (समुपदेशन) देखील केले जात आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आजच एम स्क्वेअर ट्युटोरियलशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अंदुरा येथील शिक्षक सुरेश भगत यांची आदर्श शिक्षक राज्य पुरस्कारासाठी निवड

प्रतिनिधी २६ मार्च



**अकोला:** अंदुरा येथील वरिष्ठ प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील सहायक शिक्षक सुरेश भगत यांची ‌आदर्श शिक्षक राज्य पुरस्कारा साठी निवड झाली. ध्येय एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सुरेश भगत यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्यस्तरावर त्यांची निवड करण्यात आली. हा सन्मान अकोला जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. २९ मार्च रोजी ग.दि. माडगुळकर नाट्यगृहात कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक मंत्री दादासाहेब भूसे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून राहुलदादा कुल, उषाताई खापरे, अरुण लाड आणि अमित गोरेखे यांची उपस्थिती लाभणार आहे. शाळेतील शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थांनी त्यांच अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. अनेक सामाजिक संस्था व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## रालतोच्या रेवती उंबरकरला राष्ट्रीय आंतरविद्यापीठ महिला बॉक्सिंग स्पर्धेत कास्यपदक

**अकोला:** श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाची बी.एस्सी भाग एकची विद्यार्थिनी कु. रेवती हरीश उंबरकर हिने राष्ट्रीय आंतरविद्यापीठ महिला बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. पंजाबमधील जालंधर येथे लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी राष्ट्रीय महिला बॉक्सिंग स्पर्धेत तिने उत्कृष्ट कामगिरी करत कास्यपदक पटकावले. या स्पर्धेत ५७ ते ६० किलो वजन गटात रेवतीने आपली ताकद आणि कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यांना कडवी टक्कर दिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २६ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळात रामनामाचा गजर

प्रतिनिधी २६ मार्च



**यवतमाळ :** रामनवमी निमित्त शहरात गुरुवारी पहाटेपासूनच भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. रामजन्मोत्सव शोभायात्रा समितीच्या वतीने मोटारसायकल प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. दत्त चौकातील श्री दत्त मंदिर येथून प्रभातफेरीची सुरुवात झाली.

ढोल-ताशांचा निनाद, श्रीरामाच्या जयघोषांनी शहर दुमदुमून गेले होते. भगवे झेंडे, पारंपरिक वेशभूषा आणि उत्साहाने भारलेले युवक-युवती तसेच महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही रॅली काढण्यात आली.प्रभातफेरीचा समारोप जयहिंद चौकातील श्रीराम मंदिरात झाला. यावेळी श्रीरामाच्या प्रतिमेसमोर भक्तांनी दर्शन घेऊन रामनवमीचा उत्सव साजरा केला.

# पेट्रोल संपणार ? पेट्रोल पंपांवर प्रचंड गर्दी

प्रतिनिधी २६ मार्च



**उमरखेड :** अमेरिका-इस्त्रायल विरुद्ध इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल-डिझेलची भयंकर टंचाई निर्माण होणार असून लवकरच पंप बंद पडतील, अशी अफवा शहरासह संपूर्ण तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली. यामुळे वाहनधारकांनी पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी केली असून दूरदूरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

प्रत्येकजण आपल्या वाहनासाठी इंधन साठवून ठेवण्यात व्यस्त असल्याने पेट्रोल पंप मालक आणि कर्मचाऱ्यांची धांदल उडाली आहे. शासनाच्या आवाहनापेक्षा सोशल मीडियावरील अफवांमुळे नागरिक अधिक प्रभावित झाल्याचे चित्र आहे. मात्र तालुक्यात कुठेही इंधन पुरवठ्यात तुटवडा नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नायब तहसीलदार तथा पुरवठा निरीक्षण अधिकारी अमोल महाजन यांनी सांगितले, "वाहनधारकांनी कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये. इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे. अकारण गर्दी करून स्वतःला आणि इतरांना त्रास देऊ नये."

देवसरकर पेट्रोल पंपाचे संचालक कृष्णा पाटील देवसरकर म्हणाले, "कंपनीकडून नियमित पुरवठा सुरू आहे. मात्र अफवांना बळी पडून भावनिक होऊन नागरिक अकारण गर्दी करत आहेत. यामुळे सामान्य पुरवठा देखील विस्कळीत होण्याची शक्यता आहे."

**प्रशासनाचे आवाहन**

नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माहितीवर अवलंबून राहावे. पेट्रोल-डिझेलचा पुरवठा राज्यभरात तसेच देशभरात स्थिर आणि पुरेसा आहे. अशा अफवांमुळे अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुचाकी लंपास

प्रतिनिधी २६ मार्च

**आर्णी :** जवळा शेतशिवारातून अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना उघडकीस आली. पंकज प्रकाश राठोड रा. खोपडी खु., ता. दारव्हा असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांनी एमएच २९ सीपी १४१६ क्रमांकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची तक्रार आर्णी पोलिस ठाण्यात दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

# महागावात पेट्रोलसाठी रांग



प्रतिनिधी २६ मार्च

**महागाव :** इराण-इस्त्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील इंधन साठा संपुष्टात येणार असल्याच्या अफवेने वाहनधारकांनी बुधवार (दि. २५ मार्च) रोजी सकाळपासूनच पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी केली. महागाव शहरासह धनोडा, खडका, गुंज, दहिसावळी, काळी (दौ) आणि काळी (टें) या ठिकाणच्या पेट्रोल पंपांवर पेट्रोलसाठी लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसले.

प्रत्येकजण आपल्या वाहनात जास्तीत जास्त इंधन भरण्यासाठी धडपडत असल्याने पेट्रोल पंप चालकांची चांगलीच भंबेरी उडाली. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पंप चालकांना मोठी कसरत करावी लागली. मात्र, तालुक्यातील सर्व इंधन कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवर मुबलक इंधन साठा उपलब्ध असल्याची माहिती देऊन प्रशासनाने अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

तहसीलदार अभय मस्के यांनी स्पष्ट केले की, "सध्या शासनाकडून किंवा तेल कंपन्यांकडून इंधन तुटवडा किंवा पुरवठा खंडित होण्याबाबत कोणतीही अधिकृत सूचना प्राप्त झालेली नाही. तरीही नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, शांतता राखावी आणि विनाकारण पेट्रोल पंपांवर गर्दी करणे टाळावे. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून सहकार्य करावे."

दरम्यान, महागाव शहरातील तीन पैकी दोन पेट्रोल पंपांवर साठा संपल्याने केवळ नाईक पेट्रोल पंपावरच विक्री सुरू होती. येथे मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी महागाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे यांनी पोलिस कर्मचारी नेमून परिस्थितीवर नियंत्रण ठेवले.

प्रशासन आणि पेट्रोल पंप चालकांनी एकत्रितपणे नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांमुळे घाबरून अनावश्यक गर्दी करू नये. इंधन पुरवठा सुरळीत असून कोणत्याही प्रकारची टंचाई नसल्याचे सांगण्यात आले आहे.

# शुक्रवारपासून यवतमाळ महोत्सवाचा धमाका!

## कृषी, पशुप्रदर्शन, समृद्धी सरस, सांस्कृतिक कार्यक्रमांसह पाच दिवसांचा उत्सव : शेतकऱ्यांसाठी सोन्याची संधी

प्रतिनिधी २६ मार्च




**यवतमाळ :** जिल्ह्यातील शेतकरी, महिला बचत गट आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी खुशखबर! शुक्रवार, २७ मार्चपासून भव्य 'यवतमाळ महोत्सव २०२६' चा शुभारंभ होणार आहे. २७ ते ३१ मार्च या पाच दिवसांपर्यंत कृषी विज्ञान केंद्र प्रक्षेत्र (वाघापूर) येथे हा महोत्सव रंगणार असून, कृषी महोत्सव, पशु प्रदर्शन, समृद्धी सरस प्रदर्शन, सांस्कृतिक महोत्सव, नव तेजस्विनी प्रदर्शन, शासकीय योजनांचे प्रदर्शन आणि ग्रंथोत्सव यांचा भव्य समावेश असेल.

या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन सोहळ्यात आदिवासी विकास मंत्री ना. प्रा. डॉ. अशोक उईके आणि राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

खासदार संजय देशमुख, प्रतिभा धानोरकर, नागेश पाटील आष्टिकर; आमदार भावना गवळी, ॲड. किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, राजु तोडसाम, अनिल उर्फ बाळासाहेब मांगुळकर, संजय देरकर, किसन वानखेडे; यवतमाळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, उपनगराध्यक्ष विलास कुळकर्णी, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्यासह अमरावती विभागीय अधिकारी यांची विशेष उपस्थिती असेल.

**२०० स्टॉल्स व ८ डोमची उभारणी**

कृषी विभागातर्फे २०० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, एकूण ८ डोममध्ये शासकीय दालने, परिसंवाद, चर्चासत्रे, सेमिनार हॉल, कृषी निविष्ठा दालने, महिला बचत गटांचे फूड झोन, खाद्यपदार्थ, गृहोपयोगी वस्तू, माविम बचत गटांची सेंद्रीय शेती व धान्य विक्री, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय दालन, उमेद योजनांचे प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी विशेष डोम आणि जिल्हा ग्रंथालयाचे ग्रंथोत्सव दालन असेल.

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय आणि नगर परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले की, "यवतमाळ जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासकीय योजनांची माहिती घ्यावी, नवीन कृषी तंत्रज्ञान जाणून घ्यावे आणि विविध कार्यक्रमांचा आनंद घ्यावा."

पत्रकार परिषदेनंतर जिल्हाधिकारी मीना यांनी सर्व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली आणि महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांना सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या.

**नागरिकांसाठी आवाहन :** कुटुंबासह या महोत्सवात या! शेतीसाठी उपयुक्त माहिती, सरकारी योजना, सेंद्रीय उत्पादने, स्वादिष्ट खाद्यपदार्थ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घ्या. यवतमाळ जिल्ह्यातील प्रत्येकाने मोठ्या उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पेसा क्षेत्रातील नगरपंचायतींसाठी स्वतंत्र कायदा करा

## ट्रायबल फोरमचे पंतप्रधानांना निवेदन

प्रतिनिधी २६ मार्च

**यवतमाळ :** पेसा क्षेत्रातील नगरपंचायत व नगरपरिषदांच्या कारभारासाठी स्वतंत्र कायदा करावा, अशी ठाम मागणी ट्रायबल फोरमने केली असून यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. सध्या या क्षेत्रांमध्ये सुरू असलेला नगरप्रशासनाचा कारभार घटनात्मकदृष्ट्या प्रश्नचिन्हाखाली असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

महाराष्ट्रात वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर अनेक पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्यात आला आहे. मात्र, या संदर्भात संसदेने अद्याप कोणताही स्वतंत्र कायदा केलेला नसल्याने ही प्रक्रिया घटनाबाह्य ठरत असल्याचे ट्रायबल फोरमचे म्हणणे आहे. अनुसूचित क्षेत्रांसाठी राज्यघटनेतील पाचव्या अनुसूचीत विशेष तरतुदी असून, भाग नऊ-(क) मधील नगरपरिषदांबाबतच्या तरतुदी थेट लागू होत नाहीत.

संघटनेच्या मते, अनुच्छेद २४३ अंतर्गत आवश्यक अपवाद व सुधारणा करून कायदा करण्याचा अधिकार संसदेला असताना, तो अद्याप वापरला गेलेला नाही. त्यामुळे राज्यात नगरपंचायती स्थापन करताना राज्यघटनेचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, यासंदर्भातील कायद्याचा मसुदा २००१ पासून प्रलंबित असून तब्बल २५ वर्षांनंतरही तो मंजूर झालेला नाही. तरीदेखील राज्य शासनाने नगरपंचायती स्थापन करून निवडणुका घेतल्या असल्याने हा मुद्दा अधिक गंभीर बनला आहे.

जोपर्यंत संसद स्वतंत्र कायदा करत नाही, तोपर्यंत पेसा क्षेत्रात नगरपंचायती स्थापन करू नयेत, तसेच आदिवासी समाजाला घटनात्मक न्याय द्यावा, अशी मागणी ट्रायबल फोरमचे कार्याध्यक्ष पुंडलिक मेश्राम यांनी केली आहे.

## अंतरगाव येथे कथा ज्ञानयज्ञ सोहळा

प्रतिनिधी २६ मार्च

**कळंब :** अंतरगाव येथे रामनवमी व हनुमान जयंतीनिमित्त संगीतमय श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन २६ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत करण्यात आले आहे. मेहरबानो वल्लीभाई गिलाणी यांच्या मालकीच्या पटांगणात होणाऱ्या या सोहळ्यात हभप भाग्यश्रीताई जायभाये पाटील या कथावाचन करणार आहे. २९ मार्च रोजी रात्री ९ वाजता हभप महादेव महाराज पळसगावकर (जालना) यांचे भारूड होणार आहे.

१ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता ठिकठिकाणच्या दिंड्यांसह मिरवणूक काढण्यात येणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या दिंड्यांचा सन्मान केला जाणार आहे. २ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता हभप पुरुषोत्तम महाराज जायभाये यांचे काल्याचे कीर्तन आणि दुपारी २ वाजतापासून महाप्रसाद होणार आहे.

# मानवतेची सेवा हीच खरी इबादत, हाच ईदचा खरा संदेश

## डॉ. शहरेयार खान यांचे रुग्णांनाना मार्गदर्शन

प्रतिनिधी २६ मार्च

**उमरखेड :** रमजान ईदच्या निमित्ताने युथ मोहमेन्ट जमाते इस्लामी हिंद महाराष्ट्र यांच्या वतीने मोफत हृदयरोग निदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात नागपूर येथील नामवंत हृदयविकार तज्ज्ञ डॉ. शहरेयार खान यांनी अत्यंत समर्पित सेवाभाव दाखवला.

सराफ लाईन येथील आठवडी बाजारात आयोजित या शिबिरात सुमारे ५५ हून अधिक रुग्णांनी आपली मोफत तपासणी करून घेतली. डॉ. शहरेयार खान (एमबीबीएस, एमडी, डीएम कार्डिओलॉजिस्ट) यांनी सकाळी ११ वाजल्यापासून सलग ६.३० तास अखंडपणे रुग्णांची तपासणी केली. प्रत्येक रुग्णाची त्यांनी बारकाईने, संयमाने आणि आपुलकीने तपासणी केली.

> विशेष बाब म्हणजे डॉ. शहरेयार खान ईद निमित्त आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी उमरखेडला आले होते. सुरुवातीला फक्त दोन तास सेवा देण्याचे नियोजन होते, परंतु रुग्णांची मोठी संख्या पाहून त्यांनी आपला वेळ वाढवत पूर्ण ६.३० तास सेवा दिली. त्यांचा हा सेवाभाव उपस्थितांमध्ये कौतुकास्पद ठरला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी हे शिबिर मोठा दिलासा ठरले. तपासणीनंतर रुग्णांनी समाधान व्यक्त केले आणि डॉक्टरांच्या सेवेचे कौतुक केले.

अनेक रुग्ण गंभीर हृदयविकाराने त्रस्त असल्याचे समोर आले. डॉक्टरांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मात्र रुग्णांच्या चेहऱ्यावर नवीन आशा पसरली. डॉ. खान म्हणाले, "मानवतेची सेवा हीच खरी इबादत आहे, हाच ईदचा खरा संदेश आहे."

या शिबिर यशस्वी करण्यासाठी युथ मोहमेन्टचे कार्यकर्ते साबीर नाईक, आलम सर, शाहीद खान, आजीम अली, अकरम शेख, मुस्तकीम भाई, माज सोदागर, वकार अहमद, रेहान खान यांनी विशेष मेहनत घेतली.

शेवटी जमाते इस्लामी हिंद उमरखेडचे अध्यक्ष जहीरुद्दीन काजी यांनी डॉ. शहरेयार खान यांच्या सेवेला अल्लाह कबूल करो आणि त्यांना या जगात व परलोकात उत्तम मोबदला देओ, अशी दुआ केली. "मानवतेची सेवा हीच खरी इबादत हाच ईदचा खरा संदेश" असा संदेश या शिबिरातून देण्यात आला.

मेड लाईफ फार्मा येथील वकार अहमद, नेहाल खान तसेच डॉ. खांबाडकर यांचे विशेष सहकार्य लाभले. याबद्दल साबीर नाईक यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# प्रा.ज्योती काळबांडे यांना आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

प्रतिनिधी २६ मार्च




**उमरखेड :** परिसरातील मिलिंद महाविद्यालय मुळावा येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ज्योती काळबांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल 'आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

व्हिएतनामची राजधानी हनोई येथे आयोजित सहाव्या विश्व आंबेडकरी साहित्य संमेलनात जागतिक आंबेडकरी साहित्य महामंडळाच्या वतीने हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध नाटककार डॉ. सुनील रामटेके तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ कथाकार प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील उपस्थित होते. स्वागताध्यक्ष डॉ. जगन कराडे, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे, उपाध्यक्ष तथा संमेलन संयोजक प्रो. डॉ. अनिल काळबांडे, प्राचार्य डॉ. राहुल मस्के, डॉ. राजेश गायकवाड, प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, कायदेविषयक सल्लागार एड. भूपेश पाटील, डॉ. गुरुस्वामी आदी मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रा. ज्योती काळबांडे यांचा गौरव करण्यात आला.

प्रा. ज्योती काळबांडे गेल्या ३० वर्षांपासून मिलिंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. त्याचबरोबर विविध सामाजिक संघटनांमधून त्या सक्रिय योगदान देतात.

त्यांच्या शैक्षणिक कार्यातून अनेक युवक-युवतींना प्रेरणा मिळते आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते. विद्यार्थीप्रिय शिक्षिका म्हणूनही त्या परिसरात प्रसिद्ध आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित महापुरुषांच्या वारशाचा वसा घेऊन सामाजिक वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी जागतिक पातळीवर हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. जागतिक आंबेडकरी साहित्य महामंडळाने यापूर्वी दुबई, बँकॉक, थायलंड, मलेशिया, श्रीलंका आदी देशांत अशी संमेलने आयोजित करून सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव केला आहे.

प्रा. ज्योती काळबांडे यांच्या या यशामुळे उमरखेड तसेच संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

# पोलीस कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षांचा राजीनामा; विशेष सभा तहकूब

प्रतिनिधी २६ मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थेत प्रशासनिक अनिश्चिततेचे सावट गडद झाले आहे. रिक्त संचालक पदे भरण्यासाठी बोलावलेली विशेष सभा गणपूर्तीअभावी तहकूब झाल्याने संस्थेच्या कामकाजात मोठी खळबळ उडाली. या पार्श्वभूमीवर अध्यक्ष पृथ्वीराज चव्हाण यांनी अचानक राजीनामा देत पदाचा त्याग केला आहे.



राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशानुसार पाचपैकी चार रिक्त पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली होती. मात्र, संचालकांची अनिवार्य उपस्थिती न राहिल्याने सभा होऊ शकली नाही. विशेष म्हणजे संचालक मंडळात एकूण सात सदस्य असूनही काही जण गैरहजर राहिल्याने गणपूर्तीचा प्रश्न निर्माण झाला.

> या घडामोडीनंतर अध्यक्षांच्या राजीनाम्याने संस्थेतील सत्तासंतुलन ढासळले असून संचालक मंडळ अल्पमतात आले आहे. परिणामी, पतसंस्थेवर प्रशासक नेमण्यात आल्याची माहिती पुढे येत आहे. आता संस्थेचे पुढील कामकाज प्रशासकांच्या हाती जाणार असून येत्या काळात नवीन संचालक निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

५

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरुवार दि. २६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## माध्यमिक विभागात भ्रष्टाचाराचे सत्र...

# पात्र व्यक्तींना केले अपात्र !

***कथित भ्रष्ट अधिकाऱ्याकडून मा. न्यायालयाच्या दिशानिर्देशाचे उल्लंघन**
***मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाणीचा अन्यायग्रस्तांकडून आरोप**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम येथील माध्यमिक शिक्षण विभागातील कार्यरत असलेल्या कथित अधिकाऱ्याने शिक्षणाधिकारी पदाचा प्रभार असताना आणि काही माजी शिक्षणाधिकाऱ्याच्या कार्यकाळात स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अनेक अपात्र व्यक्तींना पात्र करण्याचा सपाटा लावला होता. या प्रकारामुळे सेवाज्येष्ठता डावलून सेवाज्येष्ठतेमध्ये कायदेशीर पुर्तता न करणारे 'लाभार्थी' होत आहेत. या खाबूगिरीच्या प्रकाराने वाशीमच्या शिक्षण विभागावर चौफेर टीका होत असल्याची चर्चा आहे.






वाशीम जिल्ह्यातील अनेक संस्थांमध्ये दोन गटात वाद सुरू आहेत. काही संस्थांचे वाद चॅरीटीमध्ये तर काही संस्थांचे वाद उच्च न्यायालयामध्ये सुरू आहेत. अशा वादग्रस्त संस्थेमधील दोन्ही गटातील वादाचा गैरफायदा घेवून वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागातील 'कथित' अधिकाऱ्यांनी आर्थिक समृद्धी केल्याचे सर्वश्रुत आहे. अधिकाऱ्यांसोबतच या कार्यालयात अनेक वर्षापासून प्रतिनियुक्तीवर असलेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी सुद्धा वाहत्या गंगेत हात धुवून घेतल्याचीही चर्चा आहे. 'त्या' कर्मचाऱ्यांची आर्थिक भरभराट सुद्धा अन्यायग्रस्तामध्ये चर्चिल्या जात आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमचे कलम २२ अन्वये विश्वस्त तथा प्रस्तावित विश्वस्त, तसेच माध्यमिक शाळा संहिताच्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती ज्यामध्ये पीटीआर वरील ट्रस्टी तसेच कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत महाराष्ट्र खासगी शाळा कर्मचारी सेवा व शर्ती अधिनियम अन्वये स्पष्ट तरतूद असताना तिन्ही कायद्याच्या विपरीत जावून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सदरच्या विषयातील स्पष्टपणे दिशानिर्देश असताना जाणीवपुर्वक कायद्याचे पालन न करता, उल्लंघन करुन अपात्र व्यक्तींना पात्र करण्याचा सपाटा कथित अधिकाऱ्यांनी लावला आहे. त्यामुळे सेवाज्येष्ठता डावलून सेवाज्येष्ठमध्ये कायदेशीर पुर्तता न करणारे लाभार्थी होत आहेत. अधिकाऱ्यांच्या आर्थिक देवाण-घेवाणीच्या सुरु असलेल्या प्रकाराने अनेक सेवाज्येष्ठतेमध्ये 'पात्र' असलेले शिक्षक आणि अधिकाऱ्यांच्या चुकीच्या निर्णयाने हवालदिल झालेले संस्थाचालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये याचिका दाखल केल्याची अन्यायग्रस्तांमध्ये चर्चा आहे. माध्यमिक शिक्षण विभागातील खाबूगिरीने अनेक पात्र शिक्षक मंडळी आणि संस्थाचालकसुद्धा त्रस्त झाले आहेत. वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागाचे शुद्धीकरण करण्यासाठी आणि प्रतिनियुक्तीवर अनेक वर्षापासून काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर पाठवावे, माध्यमिक शिक्षण विभागात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाकडून आवश्यक रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणीही अन्यायग्रस्त मंडळीकडून केल्या जात आहे.

## थोडक्यात

### प्रशासन सुस्त, नागरिक त्रस्त
**बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकल्याने त्रास**





●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

शहरातील मोमीन पुरा येथील घरकुल लाभार्थी यांचे आवास योजना अंतर्गत घरकुल बांधकाम गेल्या अनेक महिन्यापासून सुरू असताना बांधकामासाठी लागणारी साहित्य रेती गिट्टी मोमीनपुरा रजा पाटी समोर टाकले असून त्यामुळे नाल्या वाहने बंद झाले आहे नळीतील घाण पाणी रस्त्यावर येत असून रजा पाटी जवळील तसेच येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून रेती रस्त्यावर असल्याने दुचाकी चालक रस्त्यावरील रेती मुळे अनेक अपघात झाल्याच्या घटना देखील घडले असून शाळकरी विद्यार्थी महिला जेष्ठ नागरिक यांना रहदारी ला त्रास होत असून नगरपरिषद ने रस्त्यावरील रिती उचलून घ्यावे असे निवेदन करते अली खान कबीर खान यांनी आपल्या नियोजनात सादर केले आहे.

### फाळेगाव येथे, १५० वर्ष पासून एक नाम सप्ताहाची परंपरा

**मंगरूळपीर :** श्री संत भायजी महाराजांच्या पदस्पर्शाने, पावन पुनीत झालेल्या ग्राम फाळेगाव येथे, राम कृष्ण विठ्ठल हरी नारायण, या नाममंत्राने गुढीपाडवा ते रामनवमी, दरवर्षी पंचक्रोशीतील भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये, परिसर दुमदुमून जातो. व अखंड अन्नदान, महाराजांनी लावून दिलेली ही संस्कृती अजूनही भक्ती व उत्साहाने, गावाकडे मंडळी, सेवा देतात. भायजी महाराज संस्थान र.न.ऐके ५४० फळेगाव.द्वारा, संस्थान व ग्राम विकासाची कार्य हाती घेतली जातात.

## तत्कालीन पालकमंत्र्याच्या कृपादृष्टीने...



# पोहरादेवीच्या विकासासाठी आलेल्या ६५० कोटीची विल्हेवाट !

***कारंजात उपविभागीय अभियंता असताना जोशींचा प्रताप**
***माजी पालकमंत्र्यांच्या मेहेरबानीने जोशींना कार्यकारी अभियंता पदाची लॉटरी**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम येथील शासकीय निवासस्थानाची देखभाल, दुरूस्ती असो अथवा पोहरादेवीच्या विकासासाठी आलेल्या ४०० कोटीची कामे असोत, जावू तेथे खावू अशी भूमिका साकारणाऱ्या शुभम जोशी यांचे वर माजी पालकमंत्र्याची मेहेरनजर असल्याचे सर्वश्रुत आहे. यापुर्वी कारंजा लाड येथे उपविभागीय अभियंता असताना शुभम जोशी यांनी पोहरादेवीच्या विकासकामासाठी शासनाकडून आलेल्या ६५० कोटीची विल्हेवाट लावून तत्कालीन पालकमंत्र्यांचा विश्वास जोशी यांनी संपादन केला. या विश्वासाची परतफेड करून आपल्या चेलेचपाट्यांचे चांगभलं करण्यासाठी शुभम जोशी यांना वाशीम जिल्ह्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता पदाची लॉटरी लागल्याची जिल्हाभरात चर्चा आहे.

ठेकेदारांशी भागिदारी करून करोडपती होण्याचा संकल्प कायम स्वरूपी बाळगणाऱ्या कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांची कारकिर्द वादग्रस्तच ठरलेली आहे.



जिल्हा नियोजन समिती मधून वाशीम येथील ३४ शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी प्रत्येकी १० लाख रूपयाप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लक्ष रूपयाचा निधी प्राप्त झाला आहे. या निधीची ३१ मार्च २०२६ पुर्वी विल्हेवाट लावून करोडपती होण्याचा पराक्रमही जोशी यांनी कामे वाटप करतांना शासन निर्देशाचे उल्लंघन करुन पात्र कंत्राटदारांवर अन्याय करून त्यांची मर्जी संपादन करणाऱ्या, भागिदारीत सहभागी होणाऱ्या निकटवर्तीय कंत्राटदारांनाच देखभाल, दुरूस्तीची कामे देण्यात आली असल्याचा आरोप अन्यायग्रस्त ठेकेदारांकडून केल्या जात आहे. सा.बां. विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे कार्यकाळात अनेक कामात भागिदारीचा पॅटर्न सुरू असल्याने जिल्ह्यातील विकासकामांचा दर्जा खालावत असल्याचे चित्र आहे. सा.बां. विभागात सुरू असलेल्या सर्व गैरकारभाराची वरिष्ठांनी व गुण नियंत्रक विभागातील तज्ञ मंडळीने सखोल चौकशी करावी. या भागिदारीतून करोडपती, लखपती होणाऱ्या सर्वांकडून शासनाने अपहार केलेल्या रक्कमेची व्याजासह वसूली करून त्या भ्रष्टांविरोधात फौजदारी कारवाई करावी अशी मागणीही जनतेकडून होत आहे.




# सौर कृषी पंप योजनेतील विलंबावरून शेतकऱ्यांचा संताप

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

राज्य सरकारच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' या महत्त्वाकांक्षी योजनेबाबत आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. 'मुख्यमंत्री महोदय, आपण दिलेली आश्वासने फक्त कागदावरच राहणार का?' असा थेट आणि आक्रमक सवाल आता शेतकरी व सामाजिक संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.

मंगरूळपीर तालुक्यासह वाशिम जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांना सौर कृषी पंपाची मंजुरी मिळूनही तब्बल एक वर्ष उलटून गेले, तरी प्रत्यक्षात पंप बसविण्याचे काम झालेले नाही. शासनाकडून ६० दिवसांत पंप बसविण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही ठेकेदार आणि संबंधित यंत्रणा पूर्णतः निष्क्रिय असल्याचा आरोप होत आहे.

**ठेकेदारांचे उडवाउडवीचे उत्तर; शेतकरी हैराण**

या संदर्भात संबंधित ठेकेदारांशी संपर्क साधला असता, ठोस उत्तर देण्याऐवजी केवळ उडवाउडवीची भूमिका घेतली जात असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. यामुळे प्रशासन आणि ठेकेदार यांच्यातील संगनमताचा संशयही व्यक्त केला जात आहे.

**दलालांचा सुळसुळाट; 'पैसे द्या, पंप बसवतो'चा धक्कादायक प्रकार**

या योजनेत दलालांचा हस्तक्षेप वाढला असून, 'पैसे द्या, सौर पंप लगेच बसवून देतो' असे सांगत शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात वसुली केली जात असल्याचे गंभीर आरोप पुढे आले आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणींचा फायदा घेत त्यांची आर्थिक लूट सुरू असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

**'ही योजना शेतकऱ्यांसाठी की ठेकेदारांसाठी?'**

शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविलेली योजना प्रत्यक्षात ठेकेदारांच्या फायद्यासाठीच चालली आहे का, असा सवाल आता जोर धरत आहे. पिकांना पाणी देण्यासाठी सौर पंपाची नितांत गरज असताना, शेतकऱ्यांना वर्षभर प्रतीक्षा करावी लागत असल्याने त्यांचे मोठे नुकसान होत आहे.

**राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाचा इशारा**

या प्रकरणावर राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर चौधरी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. 'मुख्यमंत्री महोदयांनी दिलेली आश्वासने जर केवळ कागदावरच राहणार असतील, तर शेतकऱ्यांनी कोणावर विश्वास ठेवायचा?' असा सवाल उपस्थित करत त्यांनी संबंधित ठेकेदार, दलाल आणि निष्क्रिय अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## वाशिम जिल्ह्यात घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार...







# घरकुल एकाच्या नावावर, तर निधी दुसऱ्याच्या खात्यात !



## अधिकाऱ्यांची भ्रष्ट नीती, गरिबांची केली माती

●सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार●

मंगरूळपीर तालुक्यात पीएम आवास योजनेतील घरकुल अनुदान वाटप प्रक्रियेत गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. शेलुबाजार येथील सयाबाई सहदेव इंगळे यांना घरकुल मंजूर झाले होते. मात्र काही दिवसांनि त्या घरकुलाच्या पहिला हप्ता बैक खाते क्रमांक ६७७१७० ४०२८३ मध्ये जामा न करत दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात जमा केला आहे.

त्या पंचायत समिती मंगरूळपीर ला गेल्या आसता तिथल्या घरकुल अधिकारी यांनी सांगितले की तुमच्या नावांचे पैसे दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात खाते क्रमांक ०८२०९२२०१०००१७८४ यात जमा झाले आहे. त्यानंतर त्यांची सुण रेणुका नारायण इंगळे यांनी मंगरूळपीर पंचायत समितीत विचारणा केली असता संबंधित कर्मचाऱ्यांनी सांगितले की घरकुलाचा एक हप्ते जमा झाले आहेत. सयाबाई इंगळे यांच्या कुटुंबाने एकही हप्ता स्वीकारला नव्हता. त्यांनी आधारकार्ड व बँक पासबुक दाखविले असता, पैसे इतरांच्या खात्यात जमा झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात गंभीर घोटाळ्याचा संशय निर्माण झाला असून संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. रेणुका इंगळे यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सारिका कारले यांना निवेदन देऊन घरकुलाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, व दोषीं अधिकारी यांणा निलंबित करावे. तसेच मंजूर घरकुलाचा प्रत्यक्ष लाभत्यांच्या कुटुंबास द्यावा, अशी मागणी केली आहे. मंगरुळपीर तालुक्यात घरकुलासंदर्भातील अनेक तक्रारी होत असून नागरिकांची पिळवणूक होत असल्याची चर्चा सर्वत्र आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांनी वरिष्ठ समिती नेमून संपूर्ण तालुक्यातील घरकुल प्रकरणांची चौकशी करून संबंधित जबाबदारावर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे. अनेक प्रकार उघडकीस येण्याची शक्यता दरम्यान, मंगरूळपीर तालुक्यात येथील एकच घटना नाही, तर अशा प्रकारचे रिसोड वाशीम मालेगाव तालुक्यातही अनेक प्रकार घडल्याचा तक्रारी होत्या. त्यातही अनेक लाभार्थींना तर माहितीही नाही की आपल्या नावावर घरकुल मंजूर आहे. त्याचा लाभ कोणी घेतला आहे. त्यासोबतच प्रत्यक्षात घरकुलेही बांधले नसल्याचे चित्र होते.

याबाबत माहिती अशी, शासनाकडून ज्यांना घरे नाहीत अशा गरीब, कष्टकरी, हातावर पोट भरणाऱ्या नागरिकांसाठी घरकुल योजना राबविली जात आहे. या योजनेचा हेतू जरी चांगला असला तरी सध्या पंचायत समिती मंगरूळपीर घरकुल पदाधिकारी व ग्रामसेवकांनी संगनमताने या योजनेत भ्रष्टाचार करून योजनेचा हेतूच संपविण्याचे धोरण आखले आहे.

घरकुल योजनेतील भ्रष्ट कारभाराची सर्व कर्मचारी, पोलीस पाटील, सत्ताधारी तसेच विरोधक यांनाही याची माहिती असूनही ते गप्प का बसतात? हे कळायला मार्ग नाही. गटविकास अधिकाऱ्यांना याची माहिती नसावी, असे वाटत नाही. निश्चितच तेही या कारभाराला पाठीशी घालतात, अशी नागरिकांचा समज झालेला आहे. त्यामुळे घरकुल योजनेचा खऱ्या गरजू व पात्र लाभार्थ्यांना यापुढे लाभमिळण्यासाठी या भ्रष्ट कारभाराची चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी तक्रार दाराकडुन व सामान्य जनतेतून होत आहे. रेणुका नारायण इंगळे यांनी शेवटी स्पष्ट नमूद केले आहे की येत्या आठवड्याभरातुन हि रक्कम व्याजासह माझ्या कुटुंबातील व्यक्तींना देण्यात आली नाही तर पंचायत समिती मंगरूळपीर येथे आमरण उपोषण करणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# ‘राम जन्मला गं सखे राम जन्मला’









प्रतिनिधी २६ मार्च

**अकोला :** भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ आणि मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांचा जन्मोत्सव आज संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला शहरातील टिळक रोड वरील मोठ्या राम मंदिरासह गांधी चौकातील छोटे राम मंदिर बिर्ला राम मंदिर श्री राजेश्वर मंदिरातील राम मंदिर सालासर बालाजी जलाराम मंदिर आदी मंदिरात प्रभू श्री रामाचा जन्मोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला टिळक मार्गावरील मोठ्या राम मंदिरात मागील आठ दिवसांपासून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते श्रीराम नवमी निमित्त मंदिराला अत्यंत आकर्षक रित्या सजविण्यात आले होते. मंदिरातील श्रीराम दरबाराच्या मूर्तींना आकर्षक रित्या सजविण्यात आले होते आज रामनवमीनिमित्त एका सजवलेल्या पाळण्यात प्रभू श्रीरामाची बालस्वरूपातील अत्यंत आकर्षक प्रतिमा ठेवण्यात आली होती राम जन्माच्या आधी उपस्थित महिलांनी सुंदर पाळणा गीते सादर केली तत्पूर्वी श्रीराम नवमी शोभायात्रा समितीचे अध्यक्ष श्री अरुण बाल मुकुंदाजी शर्मा यांनी सपत्नीक श्रीरामाची वेदमंत्रोपचारात पूजा अर्चना केली याप्रसंगी श्रीराम नवमी शोभायात्रा समितीचे अन्य पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते दुपारी बारा वाजता प्रभू श्रीरामाचा जन्म झाल्यानंतर मंदिरात महाआरती करण्यात आली. याप्रसंगी ’जय श्रीराम... जय जय श्रीराम चा’ जयघोष करण्यात आला. महा आरती नंतर उपस्थित भाविकांना राम खिचडीचे वितरण करण्यात आले. मंदिरा बाहेर हार, फुले, प्रसाद, रेवड्या, फुटाणे, रामफळ, लहान मुलांची खेळणी तसेच कडक उन्हापासून बचाव करणाऱ्या दवण्याची दुकाने मोठ्या प्रमाणात लागली होती त्यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी आपल्या परिवारासह येथे खरेदीचा आनंद घेतला



## गांधी चौकात मोठ्या जल्लोषात राम जन्मोत्सव साजरा

शहरातील गांधी चौकात श्रीराम उत्सव समितीतर्फे राम जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे श्रीराम उत्सव समितीतर्फे राम दरबाराची स्थापना करण्यात आली होती २२ मार्चपासून येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आज गुरुवारी श्रीराम जन्मोत्सव येथे भव्य स्वरूपात साजरा करण्यात आला एका सजवलेल्या पाळण्यात प्रभू श्रीरामाची बालस्वरूपातील प्रतिमा ठेवण्यात आली होती उपस्थित महिलांनी यावेळी एकापेक्षा एक सुंदर पाळणा गीते सादर केली तर उपस्थित वाद्य वृंदांनी एकापेक्षा एक राम गीते सादर करीत वातावरण मंत्रमुग्ध केले होते रान जन्मानंतर या ठिकाणी फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली आज सायंकाळी येथे महाआरतीचे आयोजन केले जाईल या महाआरतीला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून महाआरतीची शोभा वाढवावी असे आवाहन श्रीराम उत्सव समितीतर्फे करण्यात आले



## आज सायंकाळी शहरात ऐतिहासिक रामनवमी शोभा यात्रेचे आयोजन

दरवर्षीप्रमाणे यंदा सुद्धा विश्व हिंदू परिषद रामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने सायंकाळी पाच वाजता शहरात शोभा यात्रेचे आयोजन करण्यात येईल सायंकाळी पाच वाजता अकोल्याचे आराध्य दैवत श्रीराज राजेश्वर मंदिर येथून भव्य दिव्य रामनवमी शोभा यात्रेस आरंभ होईल तत्पूर्वी गुरुवारी सकाळी आठ वाजता टिळक रोड येथील मोठ्या राम मंदिरात रामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने भगवान श्रीरामाचे पूजन मोठ्या स्वरूपात करण्यात आले तोबायतेचा आरंभ श्रीराज राजेश्वराच्या पूजन व महाआरतीने होईल यावर्षी महापूजेचा मान मोठी उमरी येथील विनोद खळेकर व संगीता खवेकर या दांपत्यास मिळाला. या शोभायात्रेत शहरातील अनेक मंडळातर्फे राम जीवनावर आधारित सजीव देखावे सहभागी होतील या ऐतिहासिक शोभायात्रेत समस्त रामभक्त अकोले कर नागरिक युवक युवतींसह मातृ शक्तीने लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन विश्व हिंदू परिषद रामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने करण्यात आली आहे



## बिर्ला राम मंदिरात राम जन्मोत्सव थाटात साजरा

शहरातील जठारपेठ परिसरात असलेल्या बिर्ला राम मंदिरात राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला वेद पारंगत श्री पंकज शर्मा महाराज यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची पूजा अर्चना करण्यात आली मागील आठ दिवसापासून येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भल्या पहाटेपासून ते उशिरा रात्रीपर्यंत दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली बिर्ला गेट दोन नंबर परिसरात जय श्रीराम मित्र मंडळ तर्फे श्रीराम नवमीचे भव्य आयोजन करण्यात आले या ठिकाणी आज दुपारी १२ ते रात्री बारा वाजेपर्यंत भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले



वाडेगाव येथील प्रसिद्ध चित्रकार पेंटर इब्राहिम शेख मन सब यांनी रामनवमीच्या पूर्वसंध्येला प्रभू श्रीरामाचे चित्र स्वतःच्या हाताने रेखाटली असून परिसरात कौतुक होत आहे.

श्रीराम चौक बिर्ला गेट नं २ येथे रामनवमी निमित्त झालेली महाआरती. याप्रसंगी रामभक्तांची उपस्थिती होती.







शहरातील जुन्या भागातील काळा मारुती रोड येथे असलेल्या प्राचीन विठ्ठल मंदिरात प्रभू श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यावेळी माजी आमदार स्व. गोवर्धन शर्मा परिवाराच्या वतीने सौ.अर्चना कृष्णा शर्मा तसेच अरुण बालमुकुंद शर्मा यांनी कुटुंबियांसह विठ्ठल-रुक्माई आणि प्रभू श्रीरामाची विधिवत पूजा-अर्चना केली. गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन शिक्षणाला चालना द्यावी.




संकलन : आजमखान ता.प्र. बार्शिटाकळी


# पेट्रोल पंप : काही ठिकाणी रांगा तर काही बंद!



प्रतिनिधी २६ मार्च

**अकोला :** सध्या गॅस सिलिंडर हीच एकच प्रमुख समस्या बनली असतानाच गुरूवारी ऐन रामनवमीच्या दिवशी अनेक पेट्रोल पंप बंद दिसून आले. त्यामुळे चालू असलेल्या पेट्रोल पंपांवर रांगा लागल्या होत्या. गॅस सिलिंडरनंतर आता पेट्रोलचा नंबर लागतो की काय, या विचाराने नागरिक सैरभैर झाले असून, ते पेट्रोलसाठी वणवण फिरताना दिसून आले.

मध्यपूर्वेतील युद्ध लांबत असल्याने त्याचे परिणाम आता हळूहळू सर्वच क्षेत्रात जाणवायला लागले. आतापर्यंत सुरळीत असलेला पेट्रोल, डिझेलचा पुरवठा प्रभावित होतो की काय, अशी भीती निर्माण व्हायला लागली. कारण गुरूवारी लहान उमरी परिसरातील पेट्रोल पंप बंद असल्याने अनेक नागरिकांना पेट्रोलसाठी भटकंती करावी लागली. सध्याची परिस्थिती पाहता नागरिक अधिकच पॅनिक होत आहेत.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK